# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

## Maharashtra Prathamik Shikshan Parishad
(Govt. of Maharashtra Undertaking)


जा.क्र. मप्राशिप / सशि / बांध मासू / २०१८-१९ / 2530 - 1 OCT 2018

वाचा : १) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९.
२) महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम, २०११.
३) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम अंमलबजावणी शासन निर्णय दि. २२/०६/२०१५.

---

**विषय :- समग्र शिक्षा अंतर्गत सन २०१८-१९ करिताच्या बांधकाम विषयक मार्गदर्शक सूचना.**

# परिपत्रक

**प्रस्तावना :**

भारत सरकारने सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान व Teacher Education या तिन्ही योजना एकत्र करून समग्र शिक्षा ही योजना सुरू केले आहे. समग्र शिक्षा या योजने अंतर्गत वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक सन २०१८-१९ मंजूरीकरिताची प्रकल्प मान्यता मंडळाची बैठक दि. १०/०५/२०१८ रोजी घेण्यात आली. राज्याने भारत सरकारकडे सादर केलेल्या वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकाचे त्यांच्या अधिनस्त असलेल्या Technical Support Group (TSG) यांनी मुल्यमापन करून भारत सरकारकडे सादर केले होते. प्रकल्प मान्यता मंडळाने दि. १०/०५/२०१८ रोजीच्या बैठकीमध्ये सदर वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकास मान्यता दिली आहे.

बांधकामाकरिताचा मोठया प्रमाणावर Spill Over मध्ये निधी दिसत असल्याने प्रकल्प मान्यता मंडळाच्या बैठकीमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे Spill Over मध्ये मंजूर असलेल्या निधीचे नियोजन करून खर्च करण्यात यावा. यामध्ये प्राधान्याने पूर्ण झालेले बांधकामाचे समायोजन करून घेण्यात यावे.

सन २०१८-१९ करिताच्या बांधकाम विषयक मार्गदर्शक सूचना पुढीलप्रमाणे आहेत.

१) **समग्र शिक्षा अंतर्गत सन २०१७-१८ पर्यंत मंजूर असलेल्या बांधकामाचे नियोजन –**

समग्र शिक्षा अंतर्गत मंजूर निधी व प्राप्त होणारा निधी याबाबीं विचारात घेऊन प्राधान्याने पूर्ण झालेल्या व प्रगतीपथावरील बांधकामांना निधी देण्यात येईल. सुरु न झालेली बांधकामे या कार्यालयाच्या पुढील आदेशापर्यंत सुरु करण्यात येऊ नये.

कृ. मा. पहावे

D:\E Drive SSA\Draft civil guidelines 2018-19 final.docx




Jawahar Bal Bhavan, Netaji Subhash Marg, Charni Road, Mumbai - 400 004.
Tel. : 022-236 36 314, 236 79 267 Fax : 022-236 36 315 Email : mpspmah@vsnl.com, mpspmah@gmail.com